## <u>पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजना (RWBCIS)</u>
## <u>वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQ)</u>

### १. <u>पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजना (RWBCIS)</u> म्हणजे काय?

पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजना ही एक निर्देशांकावर आधारित योजना असून यामध्ये प्रतिकूल वातावरणीय निकष जसे पाऊस, तापमान, आर्द्रता इत्यादी मुळे होणाऱ्या पिकाच्या नुकसानावर आधारित कव्हर दिले जाते, यामुळे शेतकऱ्यांना विपरित वातावरणाच्या परिस्थितींमुळे होणाऱ्या पिकाच्या नुकसानाप्रती संरक्षण मिळते.

---

### २. पिकाचे नुकसान करणारे वातावरणीय निकष कोणते आणि त्यात कोणत्या धोक्यांचा समावेश होतो?

वातावरणीय निकषांमध्ये अतिवृष्टी/कमी पाऊस, कोरडा दुष्काळ, तापमानामध्ये तीव्र बद्दल, सापेक्ष आर्द्रता, हवेची गती आणि /किंवा याचा एकत्रित समावेश होतो.
प्रत्येक पिकाकरिताचा उत्पादन अटी आणि शर्ती या आधीच ठरविलेल्या आणि सरकारी नोंदणीमध्ये नमूद आहेत.

---

### ३. दाव्याचे मूल्यांकन कसे केले जाते?

अ. उत्पादन अटी पत्रकामध्ये पुर्व मान्य प्रतिकार किंवा आरंभीचा स्तर निश्चित केलेला असेल त्यानुसार दाव्याचे मापन केले जाईल आणि याव्यतिरिक्त इतर कोणतीही पद्धती किंवा मापन हे दाव्याच्या मापनाकरता वापरले जाणार नाही.

आ. दाव्यांचे मूल्यांकन हे नोंदणीकृत वातावरणी केंद्रांवरून मिळालेल्या वातावरणी माहितीनुसारच केले जाईल आणि वातावरणी माहिती मिळाल्यानंतरच दाव्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

इ. दाव्याचे मूल्यांकन हे काटेकोरपणे उत्पादन अटी पत्रक, देय रचना आणि योजनेतील सवलतींनुसारच केले जाईल.

ई. वातावरणीय माहिती ही स्वतंत्र माहिती स्त्रोतांकडून मिळविली जाते जसे आय एम डी (इंडियन मेटेरोलॉजिकल डिपार्टमेंट), एन सी एम एल (नॅशनल कोलॅटरल मॅनेजमेंट लिमिटेड), स्कायमेट इत्यादी. ज्यांना शासनाकडून मान्यता मिळालेली आहे.

उ. दाव्याच्या मूल्यांकनाकरिता पिकाच्या सर्वेक्षणाची तोपर्यंत आवश्यकता नसेल जोपर्यंत सरकारी नोंदणीत असलेल्या उत्पादन अटी पत्रकामध्ये त्याची आवश्यकता नमूद केलेली असेल.

---

### ४. या योजने अंतर्गत कोणत्या पिकांकरिता कव्हरेज मिळते?

आर डबल्यू बी सी आय एस अंतर्गत बागायती आणि वार्षिक रोख रक्कम देणाऱ्या पिकांकरित कव्हरेज दिले जाते.

---

### ५. या योजने अंतर्गत लागू केला जाणारा प्रिमियमचा दर किती?

HDFC ERGO General Insurance Company Limited. IRDAI Reg. No.146. CIN: U66030MH2007PLC177117. Registered & Corporate Office: 1st Floor, HDFC House, 165-166 Backbay Reclamation, H. T. Parekh Marg, Churchgate, Mumbai – 400 020. For more details on the risk factors, terms and conditions, please read the sales brochure/ prospectus before concluding the sale. Trade Logo displayed above belongs to HDFC Ltd and ERGO International AG and used by the Company under license. UIN: CSC - Pradhan Mantri Fasal Bima Yojana - HDE-AG-P18-25-V01-17-18, Pradhan Mantri Fasal Bima Yojana- IRDAN125P0003V01201617 UID-XXXX

या योजने अंतर्गरत बागायती शेती आणि वार्षिक रोख रक्कम पिकं घेणाऱ्या शेतकऱ्यांना विमीत रक्कमेच्या ५% किंवा मुलभूत विमा हप्ता दर यापैकी जो कमी असेल तो प्रिमियमचा दर लागू केला जाईल.

---

### ६. सर्वसाधारण विमा हप्ता अनुदान या योजनेअंतर्गत निश्चित करण्यात आलेला पिक निदाय प्रति हेक्टरी विमा दर

अ. शेतकऱ्यानी प्रत्यक्षात भरावयाचा विमा हप्ता यमधील फरक हा सर्वसाधारण विमा हप्ता अनुदान समजण्यात येईल आणि हे अनुदान केंद्र व राज्य शासनामार्फत दिले जाईल.

आ. काही राज्यांमध्ये अतिरिक्त सबसिडी देखील प्रदान केली जाते आणि ही अतिरिक्त सबसिडी त्यांच्या नोंदणीनुसार अर्थसंकल्पातून दिली जाते आणि याची माहिती शेतकऱ्यांना राज्य सरकारच्या संकेतस्थळावर बघायला देखील मिळते.

---

### ७. आर डबल्यू बी सी आय एस अंतर्गत शेतकऱ्याची पात्रता काय असते?

सर्व शेतकऱ्यांना, काही प्रमाणात पिक घेणाऱ्या आणि भाडेकरी शेतकऱ्यांसह या योजने अंतर्गत विमीत व्याजदराकरिता समाविष्ट केले जाऊ शकते.

कर्जदार शेतकऱ्यांना पण हि योजना ऐच्छिक आहे कर्जदार शेतकऱ्याला योजनेत सहभागी न होण्यासाठी कर्ज घेतलेल्या अधिसूचित पिकाकरिता नोंदणीच्या अंतिम ७ दिवस आधी पर्यंत संबधीत बँकेस त्याअनुषंगाने विमा हफ्ता कपात न करण्याबाबत कळविणे आवश्यक आहे. जे शेतकरी या योजनेत सहभागी न होण्यासाठी बँकेला कळविणार नाहीत असे शेतकरी या योजनेत सहभागी आहेत असे गृहीत धरण्यात येईल.

गैर-कर्जदार घेतलेल्या शेतकर्यांसाठी आणि आरडब्ल्यूबीसीआयएस अंतर्गत कोणत्याही अधिसूचित विमा युनिटमधील कोणत्याही अधिसूचित पिकासाठी, जवळच्या बँक शाखेत / DCCB / अधिकृत चॅनल पार्टनर / इन्शुरन्स कंपनीच्या अंतिम तारखेपर्यंत संपर्क साधण्यासाठी शेतकऱ्यांना पर्याय उपलब्ध असेल त्याकरता प्रस्तावपत्र अर्ज संपूर्ण पद्धतीते भरून बँक शाखा / इन्शुरन्स मध्यस्थी/ सीएससी केंद्रामध्ये आवश्यक प्रीमियम आणि जमीन / पिकाच्या (उदा. स्वामित्व / भाडेकरू / लागवडी अधिकार) प्रस्तावित आवश्यक कागदपत्रांच्या पुराव्यासह आवश्यक विमा हप्ता जमा करावा.

- ✓ ज्या शेतकऱ्यांना संरक्षण हवे असेल त्यांनी नियुक्त बँकेमध्ये एक खाते/कार्याकारी खाते सुरू करावे, आणि त्याची माहिती प्रस्तावपत्र अर्जामध्ये भरावी.
- ✓ शेतकऱ्यांनी जमीनाचा ओळख क्रमांक प्रस्तावपत्रामध्ये नमूद करावा आणि त्या शेतीय जमीनीकरिता दस्तावेजीय पुरावा देखील सादर करावा. शेतकऱ्याने घेत असलेल्या पिकाची हमी देणारे प्रमाणपत्र देखील सादर करावे.
- ✓ एका जमीच्या तुकड्याकरिता आणि एकच स्त्रोत असलेल्या नोंदणी केलेल्या शेतीय पिकाकरिता/ पिक घेण्याचा विचार असलेल्या पिकाकरिता विमा संरक्षण मिळेल याची खात्री शेतकऱ्याने करावी. कोणताही दुय्यम किंवा दुहेरी विमा मान्य केला जाणार नाही आणि असे झाल्याचे आढळून आल्यास शेतकऱ्यास

संरक्षण करिता पात्र धरले जाणार नाही. विमा कंपनी ही अशा प्रकारच्या दाव्यांना नाकारण्याचा आणि विमा हप्त्याचा परतावा न देण्याचा अधिकार आपल्याकडे राखून ठेवते.

- ✓ अशा शेतकऱ्यांच्या विरोधात कंपनी कायदेशीर कार्यवाही देखील करू शकेल.

या योजनेच्या दोन्ही घटकांच्या अंतर्गत एस सी/ एस टी आणि महिला शेतकऱ्यांना कमाल प्रमाणात संरक्षण देण्याचा हेतू आहे.

.

---

### ८. आर डबल्यू बी सी आय एसमध्ये नोंदणीकरण्याकरिता काही कालावधी आहे का?

संबंधित सर्व राज्य सरकारच्या अधिसूचना आणि विमा कंपनीच्या अंतिम तारखेनुसार बँक किंवा मध्यस्थांनी योग्यरित्या पाठविलेल्या विमा हप्त्याचा शेतकऱ्यांच्या भागामध्ये परिभाषित केलेल्या अंतिम तारखेच्या आत सर्व नोंदणी करणे आवश्यक आहे. अंतिम तारखेच्या कोणत्याही विलंबानंतर विमा कंपनीला संरक्षण नाकारण्याचा अधिकार आहे.

---

### ९. वैयक्तिक (एका) शेतऱ्याकरिता विमीत रक्कमेची सीमा किती असेल?

वैयक्तिक शेतकऱ्याकरिता विमीत रक्कम ही प्रती हेक्टरी मापन गुणीले शेतकऱ्याने विमीत केलेल्या पिकाकरिताच्या नोंदणीचा दिलेला भाग एवढी असेल. वेगवेगळ्या पिकाकरिता राज्य सरकारने एच डी एफ सी एर्गोला खरिप २०२० करिता दिलेली विमीत रक्कम ही संबंधित राज्य विभागामध्ये बघता येऊ शकेल.

---

### १०. कर्जदार शेतकऱ्यांकडून प्रस्तावपत्र आणि विमा हप्ता जमा करण्याची पद्धती कोणती?

अ. कर्जदार शेतकरी- आर्थिक संस्था

पिकाच्या हंगामाच्या आधारावर, बँकांनी खरिप आणि रब्बी हंगामासाठी आर्थिकतेनुसार कर्जाच्या रकमेची स्वतंत्रपणे गणना केली पाहिजे आणि अधिसूचित पिकांच्या अधीन वैयक्तिक कर्जदार शेतकऱ्याची एकत्रित घोषणा केले पाहिजे आणि अनिवार्य संरक्षणासाठी विचारात घेतले पाहिजे

बँकेमार्फत किसान क्रेडिट कार्ड(के सी सी) अंतर्गत असलेल्या पिकाच्या कर्जाचे कव्हरेज देखील या योजेने मध्ये येईल आणि या योजनेनुसार असलेल्या अनुपालनाप्रमाणे सगळ्या अहवालांचे व्यवस्थापन केले जाईल.

कर्जदार शेतकऱ्याकडून प्रस्तावपत्र आणि विमा हप्ता जमा करण्याची जबाबदारी ही नोडल बँकेची असेल.

व्यावसायिक बँक/आर आर बीच्या वैयक्तिक बँक शाखा नोडल शाखा म्हणून काम बघतील. संबंधित बँकेकरिताच्या आवश्यक मार्गदर्शिका या व्यावसायिक बँका/ आर आर बीच्या संबंधित प्रमुख बँका आणि विभागीय कार्यालये/प्रशासकिय कार्यालयांद्वारे संचालित केल्या जातील.

नोडल बँका/शाखांद्वारे दिलेल्या जाहिरनाम्यामध्ये इन्श्युरन्स युनिट, विमीत रक्कम प्रती युनिट, विमा दर प्रती युनिट, एकूण विमीत जागा, आणि संरक्षण केल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांची माहिती (लहान आणि किरकोळ किंवा इतर) आणि इतर श्रेणींच्या माध्यमाने असलेल्या शेतकऱ्यांची संख्या (एस सी/एस टी/इतर)/ महिला आणि त्यांच्या बँक खात्यांचा तपशील इत्यादी (बँक/त्यांच्या शाखा) ची माहिती दिलेल्या पद्धतीनुसार/पिक विमा पोर्टलवर दिल्याप्रमाणे नमूद करतील.

*व्यावसायिक बँक / आरआरबीची बँक शाखा निश्चितपणे विमाधारक शेतकऱ्यांच्या तपशीलासह निर्धारित वेळेत पिक इन्शुरन्स पोर्टलमध्ये नमूद केलेल्या स्वरूपात थेट एकत्रित प्रस्ताव सादर* करतील.

नोडल बँका / मध्यस्थी शेतकऱ्याचे नाव, बँक खते क्रमांक, गाव, शेतकऱ्याचे वर्गीकरण, एकर, पिक, विमीत रक्कम, जमा केलेला विमा हप्ता, सरकारचे अनुदान इत्यादी सारख्या आवश्यक तपशीलांसह वैयक्तिक शेतकऱ्यांची यादी गोळा करतील, जी सॉफ्ट कॉपीमध्ये स्वरूपात असेल आणि ती विमा कंपनीला पाठवून अंतिम तारखेच्या १५ दिवसांच्या आत घोषित करतील.

---

**११. बिगर कर्जदार शेतकऱ्यांकडून प्रस्तावपत्र आणि विमा हप्ता जमाकरण्याची प्रक्रिया कोणती?**

अ. <u>कर्जदार नसलेले शेतकरी पर्यायी घटकांतर्गत- चॅनल सहभागी/ मध्यस्थी</u>

एस ओ ए कर्ज न काढलेले आणि ज्या शेतकऱ्यांकडे विमीत व्याज असेल त्यांना नजिकच्या व्यावसायिक बँकेत किंवा विभागील ग्रामीण बँकेत (आर आर बी) किंवा पी ए सी एस (जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.) शाखेमध्ये जाऊन संरक्षण मिळविता येऊ शकेल. बँकेचे कर्मचारी शेतकऱ्याला सहकर्य करतील आणि प्रस्तावपत्र अर्ज, संबंधित दस्तावेज, विमीत रक्कम आणि लागू होणाऱ्या विमा हप्ता इत्यादीची माहिती देतील.अशा बाबींमध्ये बँकेचे खाते वापरता येणे फ़ार आवश्यक असेल.

ज्या शेतकऱ्यांनी एस ओ ए कर्ज काढलेले नाही पण त्यांना विमीत व्याजामध्ये रस आहे त्यांना देखील एक साधा प्रस्तावपत्र अर्ज भरता येऊ शकतो आणि विमा रक्कम आणि संबंधित दस्तावेज देखील जमा करावे लागतात, हे मान्य असलेल्या किंवा नियुक्त आयआरडीए, मध्यस्थी कडे जमा करावे. नियुक्त मध्यस्थी विमीत व्याज आणि संबंधित दस्तावेज ७/१२ उतारा, जमीनीचा अहवाल किंवा जमीन अधिकार अहवाल, पेरणी प्रमाणपत्र, ओळख पत्र, बँकेचे पुस्तक, (कॅन्सल केलेला चेक- बँकेच्या पुस्तकात ओळख पत्र नसल्यास आणि लागू होणारा कंत्राट/करार हा एकत्रित पिक घेणारे किंवा भाडोत्रींचा असेल तर त्या सगळ्याची पडताळणी करतील. मध्यस्थांनी आवश्यक विमा रक्कम जमा करणे आणि विमा कंपनीला वैयक्तिक / एकत्रित विमा रक्कम जमा करणे आणि जाहिरीकरण / लिस्टिंग शीट (एमआयएस) मधील सारांश तपशीलांसह, आयए ला सॉफ्ट कॉपी तयार करून देणे आणि प्रत्येक विमाधारक शेतकऱ्याच्या तपशीलासह अपलोड करणे.

आ. <u>बिगर कर्जदार शेतकरी पर्यायी घटकांतर्गत- थेट विमा कंपनीला</u>

विमीत रक्कम असलेल्या, बिगर कर्जदार शेतकऱ्याला पोस्टाद्वारे प्रस्तावपत्र अर्ज विमाकंपनीला पाठविता येतो किंवा आवश्यक असलेला विमा आणि संबंधित दस्तावेज, एकत्रित पिक घेणारे किंवा भाडेकरी शेतकरी असल्यास जमीनीची माहिती किंवा लागू होणारा करार/कंत्राट या सारखे दस्तावेज पिक विमा पोर्टलवर अपलोड करू शकतात.

विमा प्रस्तावपत्र स्वीकारणे किंवा नाकारण्याचा अधिकार विमा कंपनीकडे असेल. प्रस्तावपत्र नाकारले गेल्यास प्रस्तावपत्राच्या पावतीच्या तारखेच्या १ महिना आत विम्याची रक्कम परत केली जाईल. प्रस्तावपत्र अर्ज डाऊनलोड करण्याकरिता येथे क्लिक करा.

---

### १२. राज्याद्वारे कोणत्या प्रक्रियेचे आणि जाहिरीकरणाचे पालन केले जाते?

अ. आर डबल्यू बी सी आय एस योजनेकरिता भारत सरकारद्वारा प्रशासकिय सूचनापत्र जारी केल्यानंतर, एस एल सी सी सी आय सामान्यपणे एक बैठक घेते ज्यामध्ये उत्पादनांच्या अटी आणि पिकाच्या परिस्थितींचे जाहिरीकरण, नोंदणीकृत विभाग, आर्थिकतेचे मापन इत्यादी अखेरच्या ठरवतात, ज्यात लिलाव सूचनेचा देखील समावेश होतो.

आ. एस एल सी सी सी आय सामान्यपणे जाहिरीकरण करते आणि पत्रक देखील छापवून घेते, ज्याचे वाटप संबंधित राज्यातील लागू होणाऱ्या एजंसी ना महीन्यातून किमान एकदा मौसमानुसार असलेले पिक येण्यापुर्वी एक महिना आधी करेल, उदा: खरिप करता **मार्च** आणि रब्बीकरिता **सप्टेंबर**.

इ. राज्य सरकारच्या सहकार्याने पिक विमा पोर्टलवरती (www.agri-insurance.gov.in) जाहिरीकरणाची आवश्यक ती माहिती अपलोड करणे आणि संबंधिती एजंसींना देखील जाहिरीकरण छापून येण्यापुर्वी एक आठवडा आधी उपलब्ध करून दिले जाईल.

---

### १३. नोंदणी (एन्रोल) करण्याकरिता कोणती अंतिम तारीख असते का?

अ. पी एम एफ़ बी वाय मार्गदर्शिकेनुसार आणि बँका आणि विविध मध्यस्थींच्या अंतिम तारखांमध्ये तफावत असू शकेल पण एकंदरीत कर्जाच्या कालावधीचा विचार करता कर्जदार शेतकऱ्यांकरिता आवश्यक घटक, हे खरिफ- **एप्रिल ते जुलै आणि** रब्बी- **ऑक्टोबर ते डिसेंबर असेल**.

ब. **शेतकऱ्यांकडून बँकर्सने विमा हप्ता जमा करणे-** प्रस्तावपत्राचा अर्ज/ शेतकऱ्यांकडून विमा हप्ता घेण्याची अंतिम तारीख ही कर्जदार आणि विनाकर्जदार शेतकरी दोघांच्याही करता खरिफ - **३१ जुलै** आणि रब्बी- **३१ डिसेंबर असेल**.

भ. **बँकेने विमा कंपनीकडे जमा करणे-** एकत्रित पण सगळे जाहिरनामे/प्रस्तावपत्र हे नोडल बँक/बँकेच्या शाखांमधून खरिफ़ आणि रब्बी पिकाच्या विमा हप्ता देय रक्कमेच्या समापन तारखेच्या **१५दिवसात कर्जदार शेतकऱ्याकरिता** आणि **कर्जदारी नसलेल्या शेतकऱ्यांकरिता ७ दिवसांच्या** आत जमा केल्या गेल्या पाहिजेत.

HDFC ERGO General Insurance Company Limited. IRDAI Reg. No.146. CIN: U66030MH2007PLC177117. Registered & Corporate Office: 1st Floor, HDFC House, 165-166 Backbay Reclamation, H. T. Parekh Marg, Churchgate, Mumbai – 400 020. For more details on the risk factors, terms and conditions, please read the sales brochure/ prospectus before concluding the sale. Trade Logo displayed above belongs to HDFC Ltd and ERGO International AG and used by the Company under license. UIN: CSC - Pradhan Mantri Fasal Bima Yojana - HDE-AG-P18-25-V01-17-18, Pradhan Mantri Fasal Bima Yojana- IRDAN125P0003V01201617 UID-XXXX

म. **विमीत मध्यस्थींनी विमा कंपनीकडे जमा करणे- नियुक्त विमा एजंट द्वारे** प्रस्तावपत्र जमा करण्याची अंतिम तारीख ही जाहिरीकरण पावती/विमा हप्त्याच्या पावतीच्या ७ दिवसांच्या आत असेल.

हे लक्षात घेतले पाहिजे की सीएसी आणि एफडब्ल्यू किंवा कोणत्याही राज्य / केंद्रशासित प्रदेश सरकारला कोणत्याही परिस्थितीत निश्चित केल्यानुसार आणि हंगामाच्या अंतिम तारखा वाढविण्यासाठी अधिकृत केले जाणार नाही.

---

**१४. पोर्टलवरती माहिती एन्टर करण्याकरिता काही अंतिम तारीख असते का?**

अ. **बँकर आणि मध्यस्थी-** कोणत्याही बँकर किंवा मध्यस्थींद्वारे भरल्या गेलेल्या विमीत शेतकऱ्याची माहिती सॉफ्ट कॉपी पद्धतीने पोर्टलवरती अपलोड करण्याकरता, सगळ्याच एन्रोल्मेंटकरिताची अंतिम तारीख ही प्रिमिय जमाकरण्याच्या अंतिम तारखेपासून १५ दिवसांच्या आत असेल.

---

**१५. माहिती मिळाल्यानंतर किती दिवसात विमा कंपनी दाव्याची पुर्तता करेल?**

विमा कंपनी द्वारे अंतिम दाव्याची देय रक्कम ही पॉलिसी समापन तारखेच्या तीन आठवडे आधी तरी दिली गेली पाहिजे.

---

**१६. प्रिमियमचा दर किंवा किंमत जाणून घेण्याकरिता विमीत व्यक्तीच्या मुलभूत गरजा काय असतील?**

अ. योजना ही निवडक आखून दिलेल्या जागा म्हणजेच **इन्श्युरन्स युनिट (आय यू)** मधील प्रमुख जागांवरती कार्यरत असेल. राज्य सरकार द्वारे या इन्श्युरन्स युनिटची माहिती दिली गेली पाहिजे किंवा वातावरणीय केंद्रांची उभारणी केली गेली पाहिजे.

आ. कर्जदार किंवा बिगरकर्जदार शेतकऱ्याकरिता विमीत रक्कम ही हेक्टरी समानच असेल आणि ही रक्कम जिल्हास्तरीय तांत्रिक समिती आणि एस एल सी सी सी आय द्वारे आधीच जाहिर केलेली असेल आणि विमा कंपन्यांना याची माहिती दिलेली असेल.

---

**१७. बँकर आणि मध्यस्थींना किती कमिशन आणि बँक शुल्क द्यावे लागेल?**

बँक आणि इतर आर्थिक संस्था इत्यादींना ४% सेवा शुल्क दिले जाईल, जे शेतकऱ्यांच्या प्रिमियममधून कापून घेतले जाईल. या संदर्भातील विमा सेवा देणाऱ्या ग्रामीण एजंटला त्यानुसार कमिशन हे विमा कंपनी द्वारे दिले जाईल, ज्याकरता आय आर डी एच्या नियामकांनुसार कॅपनुसार लागू केले जाईल.

---

**१८. या योजने अंतर्गत सेवा कर लागू केला जातो का?**

आर डबल्यू बी सी आय एस ही योजना सेवाकरातून मुक्त केली गेली आहे.

HDFC ERGO General Insurance Company Limited. IRDAI Reg. No.146. CIN: U66030MH2007PLC177117. Registered & Corporate Office: 1st Floor, HDFC House, 165-166 Backbay Reclamation, H. T. Parekh Marg, Churchgate, Mumbai – 400 020. For more details on the risk factors, terms and conditions, please read the sales brochure/ prospectus before concluding the sale. Trade Logo displayed above belongs to HDFC Ltd and ERGO International AG and used by the Company under license. UIN: CSC - Pradhan Mantri Fasal Bima Yojana - HDE-AG-P18-25-V01-17-18, Pradhan Mantri Fasal Bima Yojana- IRDAN125P0003V01201617 UID-XXXX